पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे – ४११ ०१८
फोन नं. ०२० - ६७३३३३३३
फॅक्स नं. ०२० – २७४२५६००
वेबसाईट :- www.pcmcindia.gov.in

क्र.वैद्य/०९/कावि/२५१२/२०२१ दि. ११/०६/२०२१

**विषय : कोरोना विषाणू ( कोविड – १९ ) संसर्ग साखळी तोडण्यासाठी "Break The Chain" प्रतिबंधात्मक आदेश.**

संदर्भ : १) शासन परिपत्रक क्रमांक - समय २०२०/प्र.क्र. ३५/१८ (रा.व.फा.) दिनांक०७/०४/२०२०
२) मा. विभागीय आयुक्त (पिंपरी चिंचवड) कार्या क्रासा.प्र.१/आरआर/१०२४/२०२० यांचे दिनांक : २८/०८/२०२० रोजीचे पत्र.
३) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल मंत्रालय, मुंबई, क्रमांक कोरोना २०२०/प्रक्र.५८/आरोग्य - ५, दिनांक १४ मार्च २०२०
४) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५
५) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७
६) महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. महसूल व वन विभाग (DMU/2020/CR.92/DISM,1) दिनांक १७ एप्रिल २०२०, २१ एप्रिल, २९ जुन २०२०, ६ जुलै २०२०, ३१ जुलै २०२०, ३१ ऑगस्ट २०२०, ३० सप्टेंबर २०२०, १४ ऑक्टोबर २०२०, २९ ऑक्टोबर २०२०, ३ नोव्हेंबर २०२०, १४ नोव्हेंबर २०२०, २३ नोव्हेंबर २०२०, २७ नोव्हेंबर २०२०, २१ डिसेंबर २०२०, २४ डिसेंबर २०२०, २९ डिसेंबर २०२०, १४ जानेवारी २०२१, १० फेब्रुवारी २०२१, १५ मार्च २०२१, २७ मार्च २०२१, ०४ एप्रिल २०२१, १३ एप्रिल २०२१, २० एप्रिल २०२१, २१ एप्रिल २०२१, २९ एप्रिल २०२१, १२ मे २०२१ ३० मे २०२१, ०४ जुन २०२१
७) मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे आदेश जा. क्र. वैद्य/०९/कावि/१२९६/२०२१ दि. १४ एप्रिल २०२१, क्र. १३१७ दि. १७ एप्रिल २०२१, क्र. १३२१ दि. २०/०४/२०२१, क्र. १३६९ दि. २२/०४/२०२१, क्र. १५५८ दि. ३०/०४/२०२१, क्र. १६११ दि. १३/०५/२०२१ क्र. १६८६ दि. १९/०५/२०२१ क्र. २०४४ दि. २९/०५/२०२१, दि. २०४६ दि. ३१/०५/२०२१ क्र. २४०३ दि. ०५/०६/२०२१

**आदेश,**

ज्याअर्थी उपरोक्त संदर्भ क्र. ६ मधील आदेशान्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात कोविड १९ या आजाराच्या प्रसारास प्रतिबंधीत करण्यासाठी उपाययोजना व मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

ज्याअर्थी सदर अधिनियमांतर्गत राज्यात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या कोविड १९ या संसर्ग रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम २०२० अंमलात आलेले आहेत. महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड १९ च्या प्रसारास पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत केलेले आहे. साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी राजेश पाटील, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रामध्ये कोविड १९ च्या प्रसारास प्रतिबंधित करण्यासाठी खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करीत आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कोविड १९ सरासरी पॉजिटीव्हीटी दर हा दि. ०५.०६.२०२१ रोजी ५.८ % व ऑक्सिजन बेड ऑक्युपेन्सी १५.९१% होता. आज रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कोविड १९ सरासरी पॉजिटीव्हीटी दर हा ५.२% असून ऑक्सिजन बेड ऑक्युपेन्सी १०.९५% आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कोविड १९ सरासरी पॉझिटिव्हीटी दर व ऑक्सिजन बेड ऑक्यूपन्सी यांचे टक्केवारीनुसार शासनाने निश्चित केलेल्या लेव्हल विचारात घेता **पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोविड १९ च्या प्रसारास प्रतिबंधित करण्यासाठी इकडील दि. ०५.०६.२०२१ रोजी निर्गमित केलेला आदेश/मार्गदर्शक सूचना पुढील आदेश होईपर्यंत लागू राहतील. त्याचप्रमाणे -**

- पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राबाहेरून पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कंपनी, फॅक्टरी, बाधकाम स्थळ ( Construction Site ), हॉटेल, रेस्टॉरंट इ. ठिकाणी कामासाठी येणा-या कामगार व इतर व्यक्तींची निर्बंध हटविल्यानंतर पुन्हा कामावर रुजू होतांना रॅपिड अँटिजेन चाचणी ( RAT ) करणे बंधनकारक राहील.
- स्पर्धा परीक्षा क्लासेस / कोचिंग सेंटर्स / अभ्यासिका मार्गदर्शक सुचना / अटींच्या अधीन राहून एकूण क्षमतेच्या ५०% क्षमतेने सुरु राहतील.
- दि.०५.०६.२०२१ च्या आदेशातील मुद्दा क्र. १७ च्या अनुषंगाने बांधकाम स्थळावर ( Construction Site ) राहणा-या कामगारांच्या मदतीने बांधकाम मार्गदर्शक सुचना / अटींच्या अधीन पूर्ण वेळ चालू ठेवता येईल.

संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

कोविड १९ च्या प्रतिबंधासाठी केंद्र सरकार / राज्य शासन आणि या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सुचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६० तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार, अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहील.

सदर आदेश दि. १४.०६.२०२१ पासून पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात लागू राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दि. ११.०६.२०२१ रोजी दिलेला आहे.

11/06/21

पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थापना ११/१०/१९८२ पिंपरी-४११०१८

**(राजेश पाटील)**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

**प्रत माहितीस्तव सादर -**

१) मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे.

२) मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.

३) मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालय, चिंचवड.

४) सर्व क्षेत्रिय अधिकारी व सबंधित विभाग प्रमुख, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित